# प्रकरण : ५

# सारांश आणि निष्कर्ष

# प्रकरण : पाचवे
# सारांश आणि निष्कर्ष
## (Summary And Conclusions)

---

"यंत्रमाग कामगारांच्या कामाच्या ठिकाणचे पर्यावरण आणि आरोग्य" हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. प्रस्तुत लघुशोधनिबंधाची विभागणी एकूण पाच प्रकरणात केली आहे. प्रस्तुत पाचव्या प्रकरणात, आधीच्या चार प्रकरणांचा सारांश आणि अभ्यासातील निष्कर्ष माडण्यात आले आहेत.

### ❖ प्रकरण पहिले : सोलापूर शहरातील वस्त्रोद्योग : एक दृष्टिक्षेप

पहिल्या प्रकरणामध्ये दुय्यम स्त्रोतातून मिळविलेल्या माहितीच्या आधारे भारतातील वस्त्रोद्योग, महाराष्ट्रातील वस्त्रोद्योग या विषयी थोडक्यात विवेचन करण्यात आले आहे. याबरोबरच सोलापुरातील वस्त्रोद्योग, सोलापूर शहरातील कापड गिरण्यांची माहिती देण्यात आली आहे. सोलापूर शहरातील यंत्रमाग उद्योगाचा अल्प परिचय करून देण्यात आला आहे.

### ❖ प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे परिशीलन आणि पध्दतीशास्त्र

दुसऱ्या प्रकरणामध्ये दोन विभाग केले आहेत. पहिल्या विभागामध्ये उपलब्ध संशोधनपर साहित्याच्या परिशीलनावरून आधीच्या संशोधनातील प्रमुख निष्कर्षांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रकरणाच्या दुसऱ्या विभागामध्ये प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबविण्यात आलेल्या संशोधन पध्दतीविषयीचे विवेचन आहे.

प्रस्तुत अभ्यासाची विशिष्ट उद्दिष्टये खालील प्रमाणे ठरविण्यात आली आहेत.

१. सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगारांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे.

२. सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगारांच्या निवासाच्या ठिकाणच्या स्थितीचे

अध्ययन करणे.

३. सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगारांच्या कामाच्या ठिकाणच्या स्थितीचे अध्ययन करणे.

४. सोलापूर शहरतील यंत्रमाग कामगारांच्या आरोग्य-स्थितीचे अध्ययन करणे.

प्रस्तुत अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील सोलापूर शहरतील १० यंत्रमाग कारखान्याची हेतूलक्ष्मी नमुना निवड पध्दतोने (Purposive Sampling) निवड केली आहे. सोलापूर शहरात २५ हजार यंत्रमाग आणि एक लाख यंत्रमाग कामगार आहेत. संशोधिकेजवळ असणारा वेळ आणि पैसा या बाबी ध्यानात घेऊन सोलापूर शहरातील १० यंत्रमाग कारखाने व प्रत्येक कारखान्यातील २० ते २५ टक्के यंत्रमाग कामगांराची हेतूपूर्वक नमुना निवड तंत्राच्या साहयाने (Purposive Sampling Technique) निवड करण्यात आली.

तथ्य संकलनासाठी संरचित मुलाखत पत्रिकेचा (Structured Interview Schedule) अवलंब करण्यात आला. अभ्यासाची उद्दिष्टये नजरेसमोर ठेवून एक मुलाखत अनुसूची तयार केली. सदर अनुसूचीची पूर्व चाचणी घेण्यात आली नमुन्यात समाविष्ट असणाऱ्या यंत्रमाग कामगारांच्या कामाच्या ठिकाणी व काही कामगारांच्या निवासस्थानी मुलाखती घेतल्या आहेत.

संकलित केलेल्या माहितीचे सांकेतीकरण करण्यात आले. सदरची माहिती समाजशास्त्र विभागात UGC–DRS–Phase–I या प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या संगणक प्रयोगशाळेतील संगणकात भरण्यात आली. SPSS या सॉफ्टवेअरच्या साहय्याने माहितीवर प्रक्रिया करण्यात आली. संगणकाच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या सारण्यांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

मुलाखत पत्रिकेशिवाय, व्यक्तीगत निरीक्षण व छायाचित्रणाद्वारे माहिती संकलित करून सदर माहितीचा समावेश हा प्रस्तुत लघु शोधनिबंधात करण्यात आला आहे.

## ❖ प्रकरण तिसरे : यंत्रमाग कामगारांची सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी

सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगांराची सामाजिक-आर्थिक स्थिती दर्शविणारे ठळक मुद्दे खालील प्रमाणे...

- ➢ नमुन्यातील बहुतांश (५०.०%) कामगार प्रौढ वयोगटातील आहेत.
- ➢ नमुन्यातील बहुतांश (७८.७%) कामगार हे पुरूष आहेत.
- ➢ नमुन्यातील बहुतांश कामगार (६८%) साक्षर असल्याने दिसून आले.
- ➢ नमुन्यातील बहुतांश कामगार (८८.०%) हिंदु धर्माचे तर उर्वरित मुस्लिम धर्मीय आहेत.
- ➢ नमुन्यातील बहुसंख्या कामगार (४६.०%) पद्मशाली जातीचे आहे. मुस्लीम व लिंगायत समुदायतील कामगारांची संख्या लक्षणीय आहे.
- ➢ नमुन्यातील बहुतांश (७६.०%) कामगार हे अनुसूचीत जाती जमातीचे आहेत. तर उच्च जात प्रवर्गातील संख्या कमी आहे.
- ➢ नमुन्यतील बहुतांश (७६.०%) कामगार हे इतर मागस वर्गीय आहेत. उच्च जात प्रवर्गातील कामगारांची संख्या कमी व अनुसूचीत जाती / जमातीचे प्रमाण अत्यल्प आहे.
- ➢ नमुन्यातील बहुतांश (५९.३%) कामगारांची मातृभाषा तेलगू आहे. कन्नड मातृभाषा असणाऱ्याचे प्रमाण ही लक्षणीय आहे.
- ➢ नमुन्यातील बहुतांश (८५.३%) कामगार विवाहित आहेत.
- ➢ नमुन्यातील बहुसंख्या (५३.३%) कामगारांचे विवाह वेळेचे वय २१ ते ३० वर्ष होते. बालवयात विवाह झालेल्यांचे प्रमाण ही लक्षणीय आहे.
- ➢ नमुन्यातील बहुतांश (६८.७%) कुटुंबे 'विभक्त कुटुंबे' या प्रकारची आहेत. तर उर्वरित (३१.३%) कुटुंबे संयुक्त या प्रकराची आहेत.

- नमुन्यातील बहुतांश (६२.0%) कुटुंबे ही २ ते ५ इतकी सदस्य संख्या असणारी लहान आकाराची आहेत.
- निवडलेल्या नमुन्यातील बहुतांश (७0.0%) कामगारांचे मूळ ठिकाण सोलापूर शहर हेच आहे.
- निवडलेले सर्वच (१00%) कामगार कोणत्याच कामगार संघटनेचे सभासद नाहीत.
- निवडलेल्या नमुन्यातील ९५.३ टक्के कामगारांना स्वत:च्या नावाची शेतजमीन नाही.
- निवडलेल्या नमुन्यातील बहुतांश (३६.७%) कामगारांचे वडील जातिविशिष्ट व्यवसाय करणारे होते. ६६% कामगारंच्या बाबतीत आंतरपीढीय व्यावसयिक गतिशीलता दिसून येते.
- निवडलेल्या नमुन्यातील यंत्रमाग कारखान्यात विव्हिंग विभागात काम करणाऱ्या कामगांराचे प्रमाण सर्वाधिक (४0.७%) आहे. या कामासाठी अंत्यत कुशल अशा कामगारांची आवश्यकता असते.
- कामगाराव्यतिरिक्त ज्यांच्या कुंटुबातील इतर २ ते ४ सदस्य अर्थार्जनासाठी काही काम (नोकरी) करतात.अशांचे प्रमाण सर्वाधिक (७८.७%) आहे. उत्तरदात्यांची कुंटुबे सापेक्षत: गरीब असून अन्य सदस्यांनाही अर्थार्जन करावे लागते.
- सोलापूर शहरातील यंत्रमाग व्यवसायात १ ते २0 वर्षे काम करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक (८0.0%) आहे.
- निवडलेल्या १५0 कामगारापैकी ९१.३% कामगारांचे वेतन हे साप्ताहिक आहे.

- यंत्रमाग व्यवसायातील इतर विभागात काम करणाऱ्यांचे पगार प्रस्तुत अभ्यासाचे वेळी हे रू.४०१ ते रू. ६०० च्या दरम्यान होते जॉबरचे काम करणाऱ्यांचे वेतन मासिक व निश्चीत असते. त्यांचे वेतन रू. १००० ते रू.४००० इतके होने.
- नमुन्यातील सर्वच कामगारांनी प्रत्येक कारखानदार प्रत्येक दिपावलीस एक महिन्याचा आगाऊ पगार व एक महिन्याचा अधिक पगार बोनस म्हणून देत होते, असे सांगितले.
- बहुसंख्य (५४.०%) कुटुंबाचे रू. २०,००० ते रू. ४०,००० इतके सरासरी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असल्याचे दिसून आले.
- बहुसंख्य (४८.७%) कामगारांचा मासिक खर्च रू.२००१ ते रू. ४००० रूपयापर्यत आहे. कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न आणि खर्च या संबधीच्या आकडेवारीचा तुलनात्मक विचार केल्यास सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगाराचा उत्पन्न आणि खर्च याचा कसाबसा मेळ घालून उदरर्निवाह वितयक गरजा भागवितात असे दिसून येते.
- निवडलेल्या नमुन्यातील कामगारा पैकी ३१.३% कामगारांनी कर्ज घेतले होते. कर्जाचे प्रमाण रू.५००० पासून ३०,००० रूपयापर्यत होते. यापैकी १६ टक्के कामगारांनी खाजगी स्त्रोत्राकडून कर्ज घेतले आहे. तर १५.३% कामगारांनी बँक व पतपेढीकडून कर्ज घेतले आहे. त्यापैकी १३.३% टक्के कामगारांनी २ टक्के दराने, ०९.३% लोकांनी ४ टक्के दराने, ७.३ टक्के लोकानी १० टक्के दराने कर्ज घेतले आहे.
- निवडलेल्या नमुन्यातील कामगारा पैकी १३३ (८८.७%) कामगारांच्या घरी विजेची सोय आहे. ६०% कामगारांच्याकडे पंखा आहे, २९.३% कामगागकडे टेपरेकॉर्डर आहे, ५४.०% कामगारांकडे दूरदर्शन संच आहे, तर १८.०% कामगारांच्याकडे डि. व्हि.डी आहे, असे दिसून आले.

## ❖ प्रकरण ४ थे : कामगारांचे निवासस्थान, कामाच्या ठिकाणची परिस्थिती आणि यंत्रमाग कामगारांचे आरोग्य

प्रस्तुत प्रकरणाची दोन विभागामध्ये विभागणी केली आहे. पहिल्या विभागामध्ये कामगारांचे निवासस्थान तेथील भौतिक परिस्थितीचे व दुसऱ्या विभागामध्ये कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थितीचे वर्णन केले आहे.

**कामगारांचे निवासस्थान तेथील भौतिक परिस्थिती :**

सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगारांची घरे निवासस्थान आणि तेथील भौतिक परिस्थिती स्पष्ट करणारे ठळक मुद्दे खालील प्रमाणे:

**अ) कामगारांचे निवासस्थानाच्या ठिकाणची भौतिक परिस्थिती :**

नमुन्यात निवडलेल्या १५० कामगारांपैकी जवळ जवळ निम्मे (४९.३%) कामगार कनिष्ट मध्यम वर्गीय वसाहतीत राहतात ३८% कामगार झोपडपट्टीत, तर उर्वरित १२.७% कामगार कामगार वसहतीत राहतात.

- **घर स्वत:च्या मालकीचे की भाडेतात्वावरील :** नमुन्यात निवडलेल्या १५० कामगारांपैकी ६४% कामगारांचे स्वत:चे घर आहे. उर्वरित ३६% कामगार भाडयाच्या घरात राहतात.
- **घराचा प्रकार:** नमुन्यातील बहुसंख्य (६६.६%) कामगार कच्च्या घरात राहतात.२८.७ % कामगार झोपडीत्रजा पज्याच्या डब्यात राहतात
- **खोल्यांची संख्या :** नमुन्यातील बहुसंख्य (५६.७%) कामगार एकाच खोलीत राहतात. या एका खोलीचा वापर जेवण करण्यासाठी, झोपण्यासाठी, वस्तुठेवण्यासाठी,इतर गरजा भागविण्यासाठी केला जातो फक्त निवारा किंवा आडोसा एवढाच घराचा अर्थ आहे.

- **स्वतंत्र शौचालये आहेत किंवा नाही:** एकाही कामगारांच्या घरात कौंटुबिक मालकीचे शौचालय नाही ५४.७% कामगार हे शौचास उघडया मैदानावरच बसतात उर्वरित ४५.३% कामगार महानगरपालिकेने बांधलेल्या शौचालयाचा वापर करतात.
- **पिण्याचे स्वच्छ पाणी:** ९८.७% कामगार पिण्याचे पाणी बोअरवेल व सार्वजनिक नळ या माध्यमातून मिळवितात.
- **घरातील विजेची सोय :** बहुतांश (८८.७%) कामगारांच्या घरांमध्ये विजेची सोय आहे. ११.३% कामगारांच्या घरामध्ये वीजेची सोय नाही. या कामगारांच्या घरामध्ये प्रकाशासाठी रॉकेलच्या दिव्याचा वापर केला जातो.
- **स्वंयपाक करण्याची साधने:** बहुतांश (५४.७%) कामगार स्वयंपाकासाठी गॅसचा वापर करतात. ३४% कामगार रॉकेलच्या स्टोव्हचा तर ११.३% कामगार स्वयंपाकासाठी चुलीचा वापर करतात.
- **रस्त्याची व्यवस्था:** बहुतांश (६८%) कामगारांच्या घरासमोरील रस्ता कच्चा आहे उर्वरित ३२% कामगारांच्या घरासमोरील रस्ते हे पक्के आहेत.
- **ड्रेनेज व्यवस्था :** नमुन्यात निवडलेल्या बहुतांश (६६.७%) कामगारांच्या घरासमोर उघडी गटारे आहेत. या उघडया गटारीची महानगरपालिकेकडून स्वच्छता होत नसून या गटारी नेहमी तुंबलेल्या असतात.
- **कचरा:** नमुन्यात निवडलेले बहुतांश (५२.७%) कामगार कचरा कोंडाळयामध्ये कचरा टाकतात. उर्वरित (४१.३%) कामगार मोकळया जागेत कचरा टाकतात. मोकळया जगेत टाकलेल्या कच-याचे मोठे ढीग साचून पडतात. त्या कच-यात प्रामुख्याने विडीच्या पानांचे प्रमाण अधिक आहे . काही कामगार धुम्रपान करून विडीची थोटके या कचऱ्यात टाकतात त्यामुळे आग लागण्याचा धोका असतो.

➢ **डासांचा उपद्रव:** नमुन्यात निवडलेल्या सर्वच कामगारांना डासांचा त्रास होत असल्याचे सांगितले. सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव,गटारीतील पाणी साचून राहणे, बंदिस्त गटारांचा अभाव यामुळे डासांचा मोटया प्रमाणात उपद्रव होत असल्याचे दिसून आले.

**ब) कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती :**

सोलापुरातील यंत्रमाग कारखान्यातील कामाच्या ठिकाणची परिस्थिती व कामगारांची आरोग्य स्थिती स्पष्ट करणारे ठळक मुद्दे खालील प्रमाणे...

➢ **कामाचे तास:** १) नमुन्यातील सर्वच (१00%) कामगारांना ८ तास काम करावे लागते. २) सर्वच कामगारांना जेवणासाठी एक तासाची सुट्टी देण्यात येते. ३) काही वेळा काम जास्त असेल तरच फक्त पुरूष कामगार रात्रपाळीचे काम करतात. व त्यांना त्या वेळची मजुरी ही दुप्पटीने मिळते. ४) बहुतांशी ठिकाणी एकाच पाळीत (शिफ्ट) काम चालते. ५) स्त्री कामगार रात्रपाळीचे काम करीत नाहीत बाकी सर्व नियम पुरूष व स्त्री कामगारांना सारखेच आहेत.

➢ **कामाचे स्वरूप: कायम किंवा हंगामी तात्पुरते स्वरूपाचे :** नमुन्यात निवडलेले बहुतांश (९९.३%) कामगार हे सेवेत कायम झालेले आहेत. फक्त एक कामगार हंगामी होता.

➢ **सेवेची नोंद:** नमुन्यात निवडलेले सर्वच (१00%) कामगारांच्या सेवेची नोंद ठेवण्यात येते.

➢ **काम करीत असलेल्या मशिनचे प्रकार (स्वरूप) :** बहुतांश (९४.७%) कामगारांनी जुनी मशिन्स असल्याचे सांगितले तर ५.0३% कामगांनी मशिन्स नवीन असल्याचे सांगितले मात्र सर्वच मशिन्स जुनीच असल्याचे दिसून आले.

➢ **स्त्री-पुरूष स्वतंत्र विभाग:** नमुन्यात निवडलेले सर्वच (१००%) कामगार यांनी स्वतंत्र विभाग असल्याचे सांगितले प्रत्यक्ष निरिक्षणावरून देखील असेच दिसून आले.

➢ **पंख्याची सोय:** नमुन्यात निवडलले सर्वच १००% कामगारांनी पंख्याची व्यवस्था नसल्याचे सांगितले याचे कारण पंख्याच्या हवेने कापसाचे कण मोठया प्रमाणात कारखान्यात पसरतात अशा पसरलेल्या कणांचा कामगारांना कामात अडथळा निर्माण होतो.

➢ **खिडक्या:** निवडलेल्या सर्व कारखान्यात मोठमोठया खिडक्या असल्याचे स्पष्ट दिसून आले.

➢ **पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था:** नमुन्यात निवडलेल्या १० यंत्रमाग कारखान्यात कामगारांसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था चांगली आहे.

➢ **भरपूर प्रकाशाची व्यवस्था:** नमुन्यात निवडलेल्या १० यंत्रमाग कारखान्यात प्रकाशासाठी तसेच वायुवीजनासाठी मोठया प्रमाणात खिडक्यांची व्यवस्था देसून आली.

➢ **शौचालये व मुताऱ्या:** नमुन्यात निवडलेल्या १० यंत्रमाग कारखान्यात शौचालये व मुताऱ्या आहेत. मात्र स्त्री कामगार व पुरूष कामगारासाठी स्वतंत्र शौचालये व मुताऱ्या नव्हत्या.

➢ **कामगारांचे आजार:** नमुन्यातील निवडलेल्या १५० कामगारांना कारखान्यातील वातावरणामुळे कोणते ना कोणते आजार झाल्याचे स्पष्ट झाले. बहुतांश (५५.३%) कामगारांना सापेक्षता कमी गंभीर स्वरूपाचे पण पुढे गंभीर परिणाम करणारे आजार झाले आहेत. (१२.७%) कामगारांना श्वसनाचा (दमा) त्रास झाला आहे. ०२.०% कामगारांना त्वचा रोग झाले आहेत.

➢ **कामगारांची व्यसनाधिनता:** नमुन्यात निवडलेल्या (९८.०६%) कामगारांना कोणते ना कोणते व्यसन आहे दोन किंवा तीन बाबींचे व्यसन असणारेही कामगार आढळून

आले व्यसन असणाऱ्या १५० पैकी १४८ (९८.६%) कामगारांपैकी बहुतांश (४९.३%) कामगारांना पान तंबाखुचे व्यसन आहे. या व्यसनाबरोबरच इतरही अनेक व्यसने असलेली दिसून आली. या व्यसनामुळे त्यांची (कामगारांचे) आरोग्यविषयक स्थिती चांगले नसल्यास आश्चर्य नाही.

## ➢ कामगारांच्या आरोग्यावर कारखान्यातील परिस्थितीमुळे होणारे परिणाम:

यंत्रमाग कारखान्यामध्ये विविध प्रकारच्या प्रक्रिया कामगारामार्फत होत असतात त्यामुळे तेथील वातावरणाचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. सायझिंग प्रक्रियेत उघडया हाताने विविध रासायनिक पदार्थाचा वापर करत असल्याने कामगारात त्वचा रोग झाल्याचे दिसते. कारखान्यात मोठया प्रमाणात उडणाऱ्या कापसाच्या बारीक तंतूमुळे कामगारांना श्वसनाचा (दमा) त्रास होतो. सुताने भरलेली बिम हे कामगारच उचलत असतात त्यामुळे अंगदुखी, पाठदुखी, कंबर दुखी या आजाराचे प्रमाण वाढले आहे. बॉयलरच्या ठिकाणी प्रखर उष्णता असल्याने व कामगारांना त्याच्या पासून संरक्षण होण्यासाठी गॉगल्स नसल्याने कामगारांच्या डोळयांना मोठया प्रमाणात त्रास होतो. कारखान्यात होणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे कामगारात मोठया प्रमाणात बहिरेपणाची लक्षणे दिसून येतात. ब्लिचिंग विभागात कामगारांचे पाय सतत ओल्या फरशीवर असतात ज्या मुळे त्वचाविकार उदभवतात.

## ➢ सर्व साधारण निष्कर्ष :

यंत्रमाग कारखान्यातील कामाच्या ठिकाणची परिस्थिती आणि आरोग्य या दोन्हीत सहसंबध असतो हे प्रस्तुत अभ्यासासाठीचे प्रमुख गृहितक आहे. त्याचबरोबर कामगारांचे निवासस्थान आणि आरोग्य यांतही सहसंबध असतो. यासाटी सोलापूर शहरातील यंत्रमाग कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे निवासस्थान तपासून त्याचा अभ्यास करण्यात आला. अस्वच्छ झोपडया, पत्र्याचा डबा त्यात आरोग्यासाठी पोषक पर्यावरणाचा अभाव, घरगुती शैचालयाचा अभाव, उघडया गटारी, कचऱ्याने विखुरलेले रस्ते,

डास व माश्यांचा मोठया प्रमागात वावर. अशुद्ध व कमी पाणी पुरवठा. सार्वजनिक शौचालयाची कमतरता व त्याची अस्वच्छता. सर्वत्र घाणीचे साम्राज्य अशी यंत्रमाग कामगारांची निवासस्थानाची स्थिती असल्याचे दिसून आले. ही परिस्थिती निश्चितच नानवी आरोग्यला घातक आहे. या परिस्थितीमुळे ताप-सर्दी-खोकला, अतिसार जुलाब, त्वचा रोग, काविळ, मलेरीया या सारख्या आजारांनी ग्रासलेल्या कामगारांची संख्याही लक्षणीय असल्याचे दिसून आले. अत्यंत कमी उत्पन्न असलेले कनिष्ट सामाजिक-आर्थिक वर्गातील कामगार आणि त्यांची व्यसनीधनता या बाबी ही उत्तम आरोग्यास पोषक नसलेल्या आढळल्या. त्याचबरोबर कामाच्या ठिकाणच्या परिस्थिमुळे कामगारांना सापेक्षत: कमी गंभीर आजाराबरोबरच अनेक गंभीर वारंवार व दिर्घकालीन आजारांना तोंड घावे लागते सापेक्षत: कमी गंभीर आजारांमध्ये अंग दुखी, डोकेदुखी, कंबरदुखी, पाठदुखी, हातपाय दुखणे, थकवा येणे, चक्कर येणे या सारख्या सापेक्षत: कमी गंभीर स्वरूपाच्या आजारांचा समावेश आहे. मात्र वांरवर उद्‌भवणाऱ्या रोगांचा तसेच दमा (श्वसनाचा आजार) रक्तदाब, मान्सीक ताण-तणाव फुफ्फुसाचा न बरा होणारा आजार यासारखे गंभीर स्वरूपाच्या आजाराचे प्रमाण यंत्रमाग कामगारात अधिक प्रमाणात दिसून येते.

थोडक्यात, कामगारांच्या निवासस्थानाची परिस्थिती आणि कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती, या दोन्ही बाबी कामगारांचे आरोग्याचा दर्जा चांगला राहण्यास पोषक नाहीत असे प्रस्तुत अभ्यासात दिसून आले. — establish?